नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४१ Issue - 41 | वार - रविवार दि. ५ जुलै २०२६ Blow- Sunday Date 5 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुंबईत मुसळधार! रेल्वे, रस्ते जलमय

## आजही रेड अलर्ट, नागरिकांना सतर्कतेचा इशारा; हवामान विभागाचे अलर्ट पाहूनच घराबाहेर पडा : मुख्यमंत्री फडणवीस





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबईसह ठाणे, नवी मुंबई आणि पालघर परिसरात शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण महामुंबईतील जनजीवन विस्कळीत झाले. अनेक प्रमुख रस्ते आणि महामार्ग पाण्याखाली गेले, रेल्वे ट्रॅक जलमय झाले, तर विमानसेवांवर देखील परिणाम झाला. भारतीय हवामानशास्त्र विभागाने आजही अतिमुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी करत नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे.

शुक्रवारी मध्यरात्रीनंतर सुरू झालेल्या पावसाने शनिवारी पहाटेपासूनच जोर धरला. शनिवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंत मुंबईत १०० मिलिमीटरहून अधिक पावसाची नोंद झाली. शहराच्या तुलनेत पश्चिम (थर्शीिंशीप) आणि पूर्व उपनगरांमध्ये पावसाचा जोर अधिक होता.

मुसळधार पावसामुळे मुंबई-ठाणे जोडणारा लालबहादूर शास्त्री मार्ग अनेक ठिकाणी पाण्याखाली गेला. शीतल सिग्नल, कमानी सिग्नल, सोनापूर गल्ली, विद्याविहार रोड, डॉन बॉस्को कॉलेज परिसर तसेच कुर्ला-अंधेरी जोडरस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. गटारे तुडुंब भरून वाहू लागल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला.

अंधेरी सबवे (पवहशीळ डींल-रू) पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. एस. व्ही. रोड आणि विलेपार्ले परिसरातही पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक वाहनांच्या इंजिनमध्ये पाणी शिरल्याने ती रस्त्यातच बंद पडली.

आजही (५ जुलै) पावसामुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. मध्य रेल्वेवरील लोकल सेवा १० ते १५ मिनिटे उशिराने धावत आहेत. तर पश्चिम आणि हार्बर मार्गावरील लोकल सेवा ५ ते १० मिनिटे उशिराने सुरू आहेत. प्रवाशांनी घराबाहेर पडण्यापूर्वी रेल्वेचे अद्ययावत वेळापत्रक तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**आज आणि उद्याचा हवामानाचा इशारा**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने ५ जुलै रोजी मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ६ जुलै रोजी पालघर, रायगड आणि पुणे जिल्ह्यातील घाटमाथा परिसरासाठी रेड अलर्ट कायम ठेवण्यात आला असून, मुंबई, ठाणे आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, ५ जुलै रोजी दुपारी ३.२२ वाजता समुद्रात ४.१९ मीटर उंचीची भरती येणार असल्याने सखल भागांत पाणी साचण्याचा आणि पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी १९१६ या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**नागरिकांना मुख्यमंत्र्यांचे आवाहन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचे आणि हवामान विभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी अनावश्यक प्रवास टाळून सुरक्षित राहण्याचा सल्ला दिला आहे.

# केंद्र सरकारकडून कांदा उत्पादकांना दिलासा, सरकारी खरेदीदरात १३ टक्क्यांनी वाढ; प्रति क्विंटल २ हजार १२५ रुपये दर निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, तसेच सरकारच्या 'किंमत स्थिरीकरण राखीव साठ्या'ची (ईीषषशी ीिंलज्ञ) क्षमता अधिक मजबूत व्हावी, या हेतूने केंद्र सरकारने सरकारी कांदा खरेदीदरात १३ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यानुसार, आता कांद्याचा सरकारी खरेदीदर प्रति क्विंटल १ हजार ८७५ रुपयांवरून २ हजार १२५ रुपये करण्यात आला असून, हे सुधारित दर ४ जुलै २०२६ पासून लागू झाले आहेत. सध्या 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या केंद्रीय संस्थांमार्फत राखीव साठ्यासाठी कांदा खरेदीची प्रक्रिया वेगाने राबवली जात आहे.

कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या २०२५-२६ च्या दुसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, देशात यंदा ३०७.३७ लाख मेट्रिक टन कांदा उत्पादनाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या वर्षी (२०२४-२५) हे उत्पादन ३०७.६७ लाख मेट्रिक टन इतके झाले होते. म्हणजेच, यंदाचे उत्पादन हे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या आसपासच राहणार असल्याने देशात कांद्याची उपलब्धता पुरेशी आहे आणि टंचाईची कोणतीही चिंता नाही. मात्र, दरवर्षीप्रमाणे या हंगामात कांद्याचे भाव थोडे वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये कांद्याचा साठा मुबलक असून बाजारात टंचाईची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.

देशभरातील विविध बाजारपेठांमध्ये मिळून दररोज ५० हजार मेट्रिक टनांपेक्षा जास्त कांद्याची आवक होत आहे. विशेष म्हणजे, यात एकट्या महाराष्ट्रातून ३० हजार मेट्रिक टनांहून अधिक कांदा बाजारात येत आहे. सध्या घाऊक बाजारात कांद्याला सरासरी १८ रुपये प्रति किलोच्या आसपास भाव मिळत आहे, तर देशात कांद्याचा सरासरी किरकोळ दर ३१ रुपये प्रति किलो इतका आहे. सध्या शेतकऱ्यांनी चांगल्या दर्जाचा कांदा साठवणुकीत ठेवला असून, बाजारातील आवक कमी होईल अशा काळात तो विक्रीसाठी आणला जाण्याची शक्यता आहे. यंदा मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि काही भागांत नेहमीपेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे, व्यापाऱ्यांच्या एका वर्गाकडून आगामी काळात तेजी येण्याच्या अपेक्षेने कांदा खरेदी केली जात आहे. प्रमुख ग्राहक बाजारपेठांमध्ये सध्याच्या दरांवर कांद्याला फारशी मागणी नसली, तरी नाशिक आणि मध्य प्रदेशच्या काही भागांतील उत्पादन केंद्रांवर भविष्यात जास्त भाव मिळतील या अपेक्षेने साठेबाजी होताना दिसत आहे. त्यामुळे बाजारातील ही तेजी प्रत्यक्ष मागणीमुळे नसून केवळ वाढीव दरांच्या अपेक्षेवर आधारलेली असल्याचे चित्र आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; सगळ्यांच्या शंका दूर करूनच उपवर्गीकरणाचा निर्णय घेणार

# महाराष्ट्रात समान नागरी कायदा १०० टक्के लागू होणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातील मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रत्येक राज्यावर समान नागरी कायदा आणण्याची जबाबदारी सोपवलेली आहे. जर आपण हा कायदा आणला नाही, तर आपण आपल्या कर्तव्यात कसूर करू. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये समान नागरी कायदा १०० टक्के लागू केला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकार लवकरच एक विशेष समिती स्थापन करणार असून, पावसाळी अधिवेशनात मी त्याची अधिकृत घोषणा करेन, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली. अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर बोल-



ताना मुख्यमंत्री म्हणाले, हा न्यायालयाचा दृष्टिकोन नसून प्रत्येक राज्याला दिलेला स्पष्ट निर्देश आहे. महाराष्ट्रात यासंदर्भातील प्राथमिक प्रक्रिया सुरू करण्यात आली असून समितीचा अहवालही प्राप्त झाला आहे. मात्र, हा अत्यंत संवेदनशील सामाजिक विषय असल्याने, सर्व लोकांना सोबत घेऊन आणि व्यापक सहमतीने हा प्रश्न सोडवावा लागेल, असेही त्यांनी सांगितले.

लोकांच्या मनातील शंका-कुशंका दूर करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली असून, ही समिती सर्वांचे आक्षेप आणि सूचना ऐकून घेणार आहे. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच यावर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**ओबीसींचे उपवर्गीकरण राज्यात आधीपासूनच**

सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय बंधनकारक असल्याने यातून कोणालाही सूट नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, न्यायालयाने सध्यातरी 'एससी' उपवर्गीकरणाबाबत निर्देश दिले आहेत. ओबीसींच्या अंतर्गत उपवर्गीकरणाबाबत महाराष्ट्रात आधीपासूनच व्यवस्था अस्तित्वात आहे. कर्नाटक आणि तेलंगणा या राज्यांनी आधीच एससी उपवर्गीकरण घोषित केले असून, महाराष्ट्रातही सर्वांना विश्वासात घेऊनच ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



# पडघ्यात पावसामुळे रस्ता आणि गटार झाले एकच

## नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक अंतर्गत रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. काही ठिकाणी गटारे उघडी असून त्यावर कोणत्याही प्रकारची झाकणे नसल्याने रस्ता आणि गटार यामधील फरकच ओळखता येत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना जीव मुठीत धरून या मार्गावरून प्रवास करावा लागत असून अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. पडघा परिसरातील अनेक अंतर्गत रस्त्यांवर साचलेल्या पाण्यामुळे दुचाकीस्वार, पादचारी, शालेय विद्यार्थी, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाण्याखाली रस्त्याचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांना अत्यंत सावधगिरीने वाहने चालवावी लागत आहेत. उघडी गटारे पाण्याखाली झाकली गेल्याने एखादी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. याशिवाय, रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या कंपाउंडच्या पत्र्यांची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून काही ठिकाणी पत्रे वाकलेली आहेत. जोरदार वारा किंवा पावसामुळे हे पत्रे कधीही कोसळून मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित विभागाने या धोकादायक परिस्थितीकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे. गटारातील दूषित पाणी रस्त्यावर आल्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पायरोसिस यांसारख्या साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पडघ्यातील अनेक नागरिक, विद्यार्थी आणि प्रवासी नाशिक महामार्गावर लवकर पोहोचण्यासाठी या शॉर्टकट मार्गाचा नियमित वापर करतात. मात्र, साचलेले पाणी, उघडी गटारे यामुळे हा मार्ग सध्या अत्यंत धोकादायक बनला आहे. तरीही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे साचलेल्या पाण्याचा तातडीने निचरा करण्याची, गटारांची स्वच्छता करून उघड्या गटारांवर मजबूत झाकणे बसविण्याची मागणी केली आहे. अन्यथा एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळा सुरू होताच ही समस्या दरवर्षी उद्भवते. मात्र, पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक नियोजन आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे यंदा तरी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना सुरक्षित आणि सुकर वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन





**विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची केली पाहणी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार दिलीप वळसे पाटील, नगराध्यक्षा प्रणिती भालके, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, संभाजी शिंदे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत ढगळे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन माहिती घेतली.

यावेळी मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या व करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार पूर्ण झालेल्या मंदिरांतील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी होम हवन करण्यात आले होते या होम हवनचे दर्शन उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी यावेळी घेतले.



# पहिल्याच प्रयत्नात 'सेट'मध्ये यश मिळविण्यासाठी सुवर्णसंधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेचे अधिकार-प्रदत्त स्वायत्त कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, त्याचाच एक भाग म्हणून सर्व पदव्युत्तर विभागांतील विद्यार्थ्यांसाठी शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी राज्य पात्रता परीक्षा (सेट) पेपर क्रमांक १ व २ मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील सर्व पदव्युत्तर विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी दिली.



विद्यार्थ्यांना राज्य पात्रता परीक्षेची अभ्यासपूर्व तयारी करून पहिल्याच प्रयत्नात यश मिळवून देणे, परीक्षेचे स्वरूप समजावून सांगणे तसेच अभ्यासाचे योग्य नियोजन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यशाळेस 'राज्य पात्रता परीक्षा पेपर क्रमांक १' या पुस्तकाचे लेखक, नामवंत मार्गदर्शक व इंग्रजी विषयाचे अभ्यासक डॉ. शशिकांत शिंदे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये राज्य व राष्ट्रीय पात्रता परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.

कार्यशाळेचे आयोजन तीन सत्रांमध्ये करण्यात आले आहे. पहिल्या सत्रात पेपर क्रमांक १ मधील विविध घटकांचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात येईल. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन, प्रश्नोत्तर आणि परीक्षेतील यशासाठी आवश्यक अभ्यासतंत्रांवर चर्चा होईल. तिसऱ्या सत्रात संबंधित पदव्युत्तर विभागांमध्ये पेपर क्रमांक २ विषयाचे विषयनिहाय मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात ४ जुलै रोजी राज्य पात्रता परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा**

ही कार्यशाळा शनिवार, दि. ४ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत महाविद्यालयातील रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सभागृहात होणार आहे. कार्यशाळेसाठी नाममात्र सहभाग शुल्क ठेवण्यात आले असून, त्यामध्ये नावनोंदणी, भोजन व्यवस्था आणि सहभाग प्रमाणपत्राचा समावेश आहे.

महाविद्यालयातील सर्व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी आपल्या विभागप्रमुख अथवा पदव्युत्तर समन्वयकांकडे त्वरित नावनोंदणी करावी, असे आवाहन कार्यशाळेचे समन्वयक प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा (मो. ९०२१२०७३३६), अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. अमर कांबळे (मो. ९८८१५१४६७७) आणि पदव्युत्तर अधिष्ठाता प्रा. डॉ. बी. एस. बलवंत यांनी केले आहे.

# जनतेची सेवा करत करत नळदुर्ग नगर परिषदेचा विरुद्ध पक्ष गटनेता म्हणून त्या पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे : मारुती खारव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : जनतेनी माझ्यावर विश्वास टाकून मला नगरसेवक म्हणून निवडून दिले त्या सर्वसामान्य जनतेची सेवा करत करत पक्षप्रमुखांनी माझ्यावर नळदुर्ग नगर परिषदेच्या विरोधी पक्ष गटनेता पदाची जबाबदारी ज्या विश्वासाने दिली. त्या विश्वासाला पात्र राहून नळदुर्ग शहराच्या विकासात्मक कामात पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करून मी माझ्या गटनेतेपदाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे असे प्रतिपादन नळदुर्ग नगर परिषदेचे विरोधी पक्ष गटनेते तथा डॉ.आंबेडकर इंग्लिश मीडियम स्कूल नळदुर्ग चे संस्थापक मारुती खारवे यांनी नळदुर्ग ता. तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. येथील हॉटेल ताज मध्ये नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या व मित्र परिवारांच्या वतीने अभिष्टचिंतनाच्या ।कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं (आठवले) चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले. प्रारंभी बाबासाहेब बनसोडे यांच्या प्रस्ताविका नंतर मारुती खारवे यांचा उपस्थित सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने शाल,फेटा, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन पेढा भरवून यथोचित सत्कार करून वाढदिवसाचा केक कापून अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी या.प्रसंगी रिपाइं(आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, रिपाइं (आठवले ) नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे,विद्युत महावितरण कंपनीचे कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी वाघमारे आदींची ही शुभेच्छा पर भाषणे झाली. यावेळी रिपाइं (आठवले) अल्पसंख्यांक आघाडीचे तालुका अध्यक्ष बाशीदभाई कुरेशी,बौद्धाचार्य तथा संपादक दादासाहेब बनसोडे,जेष्ठ कार्यकर्ते संजय रणे बाळू रणे, कुदरत शेख, सत्यवान कांबळे विजय साखरे किशोर धुमाळ, शिवाजी वाघमारे, संतोष साखरे बाबू कुंभार, राजू साखरे, दिलीप बनसोडे, शहबाज कुरेशी सह कार्यकर्ते उपस्थित होते.

# हरित क्रांती प्रणेते कै वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित मौजे काळेवाडी (दिवे)येथे कृषी दिनाचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : हरित क्रांतीचे प्रणेते आदर्शवत लोकणेते कै.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त तालुका कृषी अधिकारी पुरंदर व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंदिर काळेवाडी येथे कृषी दिनाचा कार्यक्रम श्री अमित झेंडे सभापती पुरंदर यांचे अध्यक्षतेखाली झाला. श्री हरिभाऊ डोळे ,अजय इंगळे जि प सदस्य व सौ.स्मिता निगडे पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी श्री सुरेश थोरात , महेंद्र गिरमे , अनिल दुर्गुडे, मयूर कचरे कृषी अधिकारी उपस्थित होते .सदर कार्यक्रमात प्रस्ताविकात श्री श्रीधर चव्हाण तालुका कृषी अधिकारी पुरंदर यांनी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेमध्ये अंजीर पिकाचा समावेश झाल्याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना अंजीर पिकासाठी विमा संरक्षित रक्कम १६०००० आणि प्रति हेक्टरी रु.८००० विमा हप्ता असल्याबाबत सांगताना जास्तीत जास्त अंजीर उत्पादक शेतकऱ्यांनी ३१ जुलै पूर्वी अंजीर पिकाचा विमा घेणे विषयी आवाहन केले. तसेच गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजना विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



अंजीर व सीताफळ संशोधन केंद्राचे डॉ.प्रदीप दळवे यांनी अंजीर सीताफळ पिक मध्ये हिरवळीच्या खताचे व सेंद्रिय घटकाचे महत्त्व सांगताना जमिनीची सुपीकता वाढविण्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच शेतकऱ्यांनी कोणता अंजिराचा कोणता बहार घ्यावा याविषयी मार्गदर्शक केले. डॉ.युवराज बालगुडे त्यांनी सिताफळ अंजीर कीड व्यवस्थापनाबाबत माहिती देताना एकात्मिक कीड व्यवस्थापन कसे करावे याचे उत्तम उदाहरण देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांच्या प्रश्न उत्तरा ला समाधानकारक उत्तरे दिली

श्री. दीपक गावडे शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र बारामती यांनी एल निनो अर्थात कमी पावसाचे प्रमाण या हवामान बदल घटकास कसे निराकरण करण्यात येईल या संदर्भात फळपीक भाजीपाला फुल पीक यांची लागवड तंत्रज्ञान कसे असावे तसेच शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी या संदर्भात मार्गदर्शन केले.

श्री उमेश निकम कृषी अधिकारी बँक ऑफ महाराष्ट्र , महाबँक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान व ग्रामीण विकास केंद्र भिगवन यांनी शेतकऱ्यांना तसेच महिला शेतकरी बचत गटास शेतीपूरक व्यवसाय बाबत प्रशिक्षणासाठी व शेतकरी कर्ज बाबत मार्गदर्शन करून लाभ घेणे बाबत आवाहन करण्यात आले.

श्री.अतुल सस्ते प्रगतशील शेतकरी साकुर्डे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना रुंद वरंबा आणि सरी बीबीएफ तंत्रज्ञान पद्धतीने लागवड प्रशिक्षणाचे मार्गदर्शन करून बीबीएफ यंत्राची ओळख करून दिली

सदर कार्यक्रम दरम्यान खरीप हंगाम २०२५ २६ मधील पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.ीरी तसेच बोपगाव व दिवे येथील पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते वॉटर कप स्पर्धेमध्ये उल्लेखनीय काम करत असलेले गटास श्री अमित झेंडे सभापती पंचायत समिती पुरंदर यांनी सन्मान करून पुढील कार्यास शुभेछा देण्यात आल्या.

श्री हरिभाऊ लोळे जिल्हा परिषद पुणे जिल्हा सदस्य यांनी उपस्थित शेतकऱ्यांना कृषी दिनाच्या निमित्ताने शेतीविषयक योजनांचा पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले

सदर कार्यक्रमास पुरंदर तालुक्यातील सर्व उप कृषी अधिकारी ,सहाय्यक कृषी अधिकारी तसेच श्री योगेश काळे माजी सरपंच , तसेच दिवे पंचक्रोशीतील व पुरंदर तालुक्यातील बहुसंख्य प्रगतशील शेतकरी व महिला शेतकरी उपस्थित होते.शुभांगी रासकर कोंडीबा जरांडे यांनी कार्यक्रम संपन्न करण्यास विशेष प्रयत्न केले, कृषी महाविद्यालय येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव च्या विद्यार्थीनी उपस्थित होत्या .श्री गणेश जगताप उपकृषी अधिकारी सासवड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व श्री. आर .डी .खेसे मंडळ कृषी अधिकारी सासवड यांनी आभार प्रदर्शन मानून कार्यक्रमाची सांगता केली.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन मा तालुका कृषी अधिकारी श्री. श्रीधर चव्हाण श्री . रविंद्र खेसे मंडळ कृषी अधिकारी,सासवड श्री.गणेश जगताप उप कृषी अधिकारी सासवड

यांच्या मार्गदर्शनाखाली सासवड मंडळ कृषी अधिकारी कार्यालय अधिनस्त सर्व सहाय्यक कृषी अधिकारी यांनी केले होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपुरात मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्या भव्य भक्तनिवासाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते लोकार्पण

## आजचा दिवस मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील हजारो ग्रामस्थ-भाविकांसाठी आनंदाचा व भाग्याचा : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर येथे मंचर ग्राम स्थ वारकरी सेवा मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या धर्मशाळा-भक्तनिवासाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी गृहमंत्री तथा आम दार दिलीपराव वळसे पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, ह.भ.प. कानोबा महाराज मोरे, यांच्यासह मान्यवर यावेळी उप-स्थित होते.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी हक्काचे घर

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होते. आजचा दिवस मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील हजारो ग्रामस्थ-भाविकांसाठी आनंदाचा व भाग्याचा आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्यच. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे आपुले, तोचि साधू ओळखावा या तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत त्या म्हणाल्या, ऊन-पावसाची पर्वा न करता पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम स्थ व वारकरी मंडळांनी ही वास्तू उभारली हे कौतुकास्पद आहे.

मंचरची ऐतिहासिक परंपरा व वास्तूची उपयुक्तता

मंचरला पांडवकालीन बारव, तपेश्वर भूमीची आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. संत तुकाराम महाराजांनी 'मंचरी' हा हस्तलिखित ग्रंथ मंचर येथे लिहिला, त्यात ५३७ अभंग आहेत. ही मंचरकरांसाठी अभिमानाची बाब आहे, असे पवार यांनी नमूद केले.

वारीमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला हक्काचा निवारा मिळावा यासाठी ही सुसज्ज धर्मशाळा उपयोगी ठरेल. ही इमारत भक्ती व सेवेचे केंद्र बनेल. मंडळाचे संस्थापक ह.भ.प. मारुती धोंडेबा मोर्डे ऊर्फ अण्णा गुरुजींनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे. 'पूर्ण केला मनोरथ' या उक्तीप्रमाणे आंबेगाव-मंचरच्या ग्रामस्थांचे पंढरपुरात हक्काचे घर झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

दानशूरांचे ऋण व पंढरपूर विकास आराखडा

गोवर्धन समुदायाचे देवेंद्र शहा यांच्यासह अनेक दानशूरांनी प्रकल्पासाठी मोठी मदत केली, त्यांचे ऋण उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

दादांना पंढरपूर जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ बनवायचे होते. पालखी महामार्ग हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांची अनेक स्वप्ने पूर्ण झाली, उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्या म्हणाल्या.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्याला राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिली आहे. सुमारे ४,००० कोटींच्या या आराखड्यातून पुरातन मंदिर-मठांचे जतन, भव्य कॉरिडॉर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा घाट सुशोभीकरण, आधुनिक वाहन-तळ, व्यापारी संकुल, रस्ते, पूल व पालखी तळांचा विकास होणार आहे. १२ जूनला पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात १० दिंडी प्रमुख व मंदिर समिती अध्यक्षांची बैठक घेऊन सुरक्षित सुविधा देण्याचे निर्देश दिले. दिवेघाट-हडपसर व बारामती-इंदापूर मार्गाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण होईल. वारीसाठी एसटी महामंडळाच्या साडेपाच हजार बसची व्यवस्था करण्यात आली आहे.

मी तेर या संत गोरा कुंभारांच्या गावची आहे. दर एकादशीला आमच्याकडेही वारी, पालखी, भजन-कीर्तन असते. लहानपणा-पासून माऊलींशी वेगळे नाते आहे. दादांचे शब्द खरे करून दाखवणे ही माझी जबाबदारी आहे, असे सांगत, एलनीनोच्या संकटातून महाराष्ट्राला मुक्त करण्याची प्रार्थना त्यांनी विठुरायाचरणी केली.

कार्यक्रमास पंढरपूर व मंचर नगरपालिकेचे नगरसेवक, सेवा मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, उपाध्यक्ष सुभाष थोरात, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शासकीय अधिकारी, पत्रकार व हज-ारो वारकरी उपस्थित होते.

# सोलापुरात रोजगार व असंघटीत क्षेत्राच्या व्यापक सर्वेक्षणाला प्रारंभ : अचूक माहितीसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात प्रथमच Periodic Labour Force Survey (PLFS) व Annual Survey of Unincorporated Sector Enterprises (SUSE) या दोन महत्त्व-पूर्ण सर्वेक्षणांना सुरुवात झाली आहे. जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते माहिती पत्रकाचे विमोचन करून सर्वेक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.

पहिल्यांदाच जिल्हास्तरीय सर्वेक्षण महाराष्ट्र इन्स्टीट्यूशन फॉर ट्रान्सफॉरमेशन (मित्रा) यांच्या सहकार्याने एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राज्यात ही सर्वेक्षणे राबविली जाणार आहेत. रोजगार, बेरोजगारीचे प्रमाण आणि असंघटीत क्षेत्राबाबत जिल्हानिहाय आकडेवारी मिळवणे हा या सर्वेक्षणाचा उद्देश आहे. सोलापूर जिल्ह्यात झडत्र्ड साठी नागरी व ग्रामीण भागातील १२०, तर डणडए साठी ६४ असे एकूण १८४ नमुना गावे/ब्लॉक निवडण्यात आले आहेत.

नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी नागरिकांना प्रगणकांना अचूक व सत्य माहिती देण्याचे आवाहन केले. उप आयुक्त संगीता मोरे म्हणाल्या, शास्त्रीय नमुना निवड पद्धतीनुसार निवडक कुटुंबे व आस्थापनांचे सर्वेक्षण होणार आहे. ही कुटुंबे संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे प्रत्येकाची माहिती मौल्यवान आहे. संकलित माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. यावेळी सांख्यिकी अधिकारी दिनकर बंडगर व कर्मचारी उपस्थित होते.

सर्वेक्षणाचे महत्त्व

या सर्वेक्षणाद्वारे रोजगाराची स्थिती, श्रमशक्ती सहभाग दर, स्वयंरोजगार, लघु व असंघटीत बिगर कृषी उद्योगांची स्थिती, कामगारांचे उत्पन्न यासंबंधीची सांख्यिकीय माहिती संकलित होण-ार आहे. या आकडेवारीच्या आधारे जिल्हास्तरीय विकास आराखडे तयार करणे, रोजगारविषयक धोरणे निश्चित करणे, उद्योग व गुंतवणुकीला चालना देणे व राज्याच्या-देशाच्या विकासाचे अचूक चित्र समोर आणणे शक्य होणार आहे.

# पोलिसांची नोकरी म्हणजे कुटुंबाचा त्याग करून जनतेची सेवा करणे होय : नगराध्यक्ष बसवराज आप्पा धरणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के.गायकवाड : सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची फार मोठी जबाबदारी पोलीस प्रशासनावर असून त्या करिता पोलिसांना नेहमी सतर्क रा-हावे लागते.कारण कोणत्या वेळी कोणता संवेदनशील प्रसंग उद्धवेल हे सांगता येत नाही आणि ज्या क्षणी एखादा संवेदनशील प्रसंग निर्माण झाला त्याचक्षणी जेवण करता करता हात धुवून पोलिसांना त्या ठिकाणी जावं लागतं,कधी कधी दिवाळी सारखा सण सुद्धा आपल्या कुटुंबाम ध्ये त्यांना आनंदाने साजरा करता येत नाही.याचा विचार केला असता पोलिसांची नोकरी म्हणजे कुटुंबाचा त्याग करून जनतेची सेवा करणे होय असं म्हटलं तरी ते वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन नळदुर्ग नगर परिषदेचे विद्यमान नगराध्यक्ष बसवराज आप्पा धरणे यांनी येथे आयोजित कार्यक्रम ात बोलताना केले.

पोलीस दलातून तब्बल ३३ वर्षे सेवा करून मुरूम येथील मूळ रहिवासी असलेले आणि सध्या नळदुर्ग येथे स्थायिक झालेले पो-लीस कॉन्स्टेबल विजयकुमार राठोड हे नळदुर्ग पोलीस ठाणे येथून सेवानिवृत्त झाले.त्यांच्या सेवा निवृत्ती निमित्त व त्यांच्या २५ व्या सिल्वर जुबली लग्नाच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांचा सपत्नीक सत्कार समारंभाचे आयोजन येथील राणा कॉम्प्लेक्स मध्ये करण्यात आले होते.या वेळी नगराध्यक्ष धरणे बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की पोलीस कर्मचाऱ्यांना रात्रीचा दिवस आणि दिवसाची रात्र करून २४ तास ड्युटी करावी लागते. त्यांच्या नोकरीच्या काळात त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य ही देता येत नाही अशी खडतड नोकरी करून निष्कलंकपणे सेवानिवृत्त झा-लेले विजयकुमार पवार यांचे करावे तेवढे कौतूक थोडेच आहे. याप्रसंगी शिवसेना (उबाटा ) जिल्हा उपप्रमुख सरदार सिंह ठाकुर, शिवसेनेचे शहर अध्यक्ष संतोष पदाले,नगरसेवक तथा पत्रकार सुधीर पोतदार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के. गायकवाड,सेवानिवृत्त मुख्याध्यापक राठोड सर सह विद्यार्थ्यांची शुभेच्छा पर भाषणे झाली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कारमुर्ती विजय कुमार राठोड यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करप्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल चे संस्थापक मारुती कारवे यांनी केले.याप्रसंगी नगराध्यक्ष विरोधी पक्ष घटनेचे व सत्ताधारी आणि विरोधी बाकावरील नगरसेवक शिवसैनिक रिपब्लिकन कार्यकर्ते पत्रकार सह सर्वपक्षीय कार्यकर्ते आप्तेष्ट नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते यामुळे या सत्काराला जवळपास नागरी सत्कार समारंभाचे स्वरूप प्राप्त झाले होते.

**वाखरी पालखी तळाची आरोग्यमंत्र्यांनी केली पाहणी**

# सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते आरोग्यमंत्री आबिटकर यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय सरडे, आरोग्य अधिकारी डॉ. म हेश सुडके यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



आषाढी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्यासह सर्व संतांचे पालखी सोहळे वाखरी येथे मुक्कामी दाखल होतात. येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांसाठी आषाढी प्रशासनाच्या वतीने वाखरी पालखी तळावर उपलब्ध करण्यात आलेल्या व देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतली.

यावेळी त्यांनी वाखरी पालखी तळाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. तळावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच महिला वारकरी भाविकांसाठी आरोग्य विभागाकडून देण्यात येणाऱ्या सुविधा याबाबत माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना त्यांनी केल्या.

याप्रसंगी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, राज्य आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय सरडे, आरोग्य अधिकारी डॉ. म हेश सुडके आदी उपस्थित होते.

# समाजसेवक सुफी सय्यद शामशोद्दीन यांना डॉक्टरेट पदवी; सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, पोलीस मित्र सोशल असोसिएशनचे संस्थापक सचिव सुफी सय्यद शामशोद्दीन यांना वर्ल्ड कल्चरल अँड एज्युकेशनल ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून मानद डॉक्टरेट (Doctor of Philosophy) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे सामाजिक, शैक्षणिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



लातूर जिल्ह्यातील भिसे वाघोली या गा-वचे सुपुत्र असलेले सुफी सय्यद शामशोद्दीन यांनी अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतले आहे. समाजातील वंचित, गरजू व दुर्बल घटकांसाठी विविध उपक्रम राबविणे, सामाजिक सलोखा, शैक्षणिक जनजागृती, युवकांना मार्गदर्शन, रक्तदान, आरोग्य शिबिरे, पर्यावरण संवर्धन तसेच विविध जनहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

पोलीस मित्र सोशियल असोसिएशनचे संस्थापक सचिव म्हणून त्यांनी समाज आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवाभावी उपक्रम राबविल्यामुळे त्यांना अनेक संस्थांकडून यापूर्वीही विविध पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत.

त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व मानवताव-ादी कार्याची दखल घेत वर्ल्ड कल्चरल अँड एज्युकेशनल ऑर्गनायझेशन, नवी दिल्ली यांनी त्यांना मानद डॉक्टरेट पदवी बहाल केली. हा सन्मान केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर भिसे वाघोली गाव, लातूर जिल्हा आणि संपूर्ण समाजासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

सुफी सय्यद शामशोद्दीन यांच्या या यशाबद्दल सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# वारीत अत्यावश्यक रुग्णांकरिता प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

## वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भाविक येत असतात. पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीतून वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक म्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, ऑनलाईनव्दारे आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, नगराध्यक्षा प्रणिता भालके, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, अपर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून, यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरवताना कोणतीही उणीव राहू नये. वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

पालखी मार्गावर वारकरी, भाविकांसाठी ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयूची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक उपचारांसाठी १५६ ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' वारकरी भक्तांसाठी उभारण्यात येणार आहेत. २१५ फिरते आरोग्य दूत नेमण्यात येणार आहेत. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांमध्ये १६ ठिकाणी सुसज्ज आयसीयू कक्ष व १७ ठिकाणी तात्पुरते 'आपला दवाखाना' सुरू राहणार आहेत, अशी माहिती श्री. आबिटकर यांनी दिली.

पालखी मार्गावर एकूण ३५३ रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर दिंडी प्रमुखांना प्राथमिक औषधोपचार किटचे वाटप करण्यात येणार आहे. वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ३ हजार ८७ वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी तसेच फिरते मनुष्यबळ उपलब्ध राहणार आहे. त्याचबरोबर ३०२ विशेष तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे.

पंढरपूर येथे वारकरी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता तीन दिवस आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. वारीत वारकऱ्यांची सेवा करणे हे भाग्याचे आहे. सर्वांनी पांडुरंगाच्या सेवेचा भाग म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर जिल्हा रुग्णालयातील २०० बेडच्या हॉस्पिटलसाठी आवश्यक ती कार्यवाही करून हॉस्पिटल सर्व सुविधायुक्त कार्यान्वित करावे, अशी सूचना केली. वारी कालावधीत शहरात आयसीयू सेंटरची संख्या वाढवावी, असेही त्यांनी सांगितले. आमदार राजू खरे यांनी पालखी मार्गावरील सुविधा व उपजिल्हा रुग्णालयातील सुविधा व स्वच्छता कायम ठेवावी, असे सांगितले. आमदार अभिजीत पाटील यांनी वारी कालावधीत ६५ एकर परिसरात वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने या ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करावे, अशी मागणी केली. नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी वारी संपल्यानंतर संसर्गजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असल्याने आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, असे सांगितले.

यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी पीपीटीद्वारे वारी कालावधीत वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

### पंढरपूर उप जिल्हा रुग्णालयाला आरोग्यमंत्र्यांची भेट

**आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली. रुग्णालयाची स्वच्छता पाहिली. तसेच रुग्णांशीही संवाद साधून त्यांना मिळत असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती घेतली. तसेच आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.**

# कळंब तहसील कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पगार कापणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब दि.४(प्रतिनिधी)

तहसील कार्यालय कळंब येथील अनेक कर्मचारी हे दि. २३ जून रोजी साडेदहा नंतर उशिरा कार्यालयात येऊन हजेरी नोंदवहीवर स्वाक्षरी करत असल्याचे कळंब येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांच्या निदर्शनास आले होते. शासनाने ठरवून दिलेल्या वेळेवर न येता उशिरा येऊन हजेरी नोंद वहीवर स्वाक्षरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अर्ध्या दिवसाचा पगार कपात करण्याची तक्रार राहुल मुळे यांनी कळंब तहसीलदार श्री.हेमंत ढोकले यांच्याकडे दाखल केली होती.

**राहुल मुळे यांच्या तक्रारीवरून तहसीलदार यांचा परिपत्रक काढून कर्मचाऱ्यांना इशारा**

सदरील तक्रारीची गंभीर दखल घेऊन तहसीलदार हेमंत ढोकले यांनी अधिकारी कर्मचारी यांना उद्देशून परिपत्रक काढले आहे. परिपत्रकात म्हटले आहे की, शासन निर्णयान्वये




कर्मचारी यांची कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ करण्यात आलेली आहे. जेवणाची वेळ १ ते २ या वेळेमध्ये जास्तीत जास्त अर्धा तास आहे. त्यामुळे सर्वांनी वेळेबाबतचे काटेकोरपणे पालन करावे. यापुढे वेळेबाबत पालन न झाल्याचे दिसून आल्यास संबंधिता विरुद्ध नियमानुसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी. जे कर्मचारी हे उशिरा आलेले आहेत त्यांची लेट रजिस्टरला नोंद घेतली जाणार आहे. ज्या कर्मचारी यांची तीन वेळा लेट रजिस्टरला नोंद झालेली असेल त्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचा थेट परिपत्रक काढून आदेश दिला आहे.

**कर्मचारी संघटनांनी शासनाकडे भांडून पाच दिवसाचा आठवडा करून घेतला परंतु अजूनही अधिकारी कर्मचारी कार्यालयात वेळेवर येत नसल्याने नागरिकांना तासनतास वाट पाहत बसावे लागते. त्यामुळे अशा कामचुकार अधिकारी कर्मचाऱ्यावर कारवाई झालीच पाहिजे.**

**– राहुल मुळे**
**सामाजिक कार्यकर्ते कळंब**

# प्रथम वर्ष डी.फार्मसी प्रवेशासाठी कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरवात

**दि. १५ जुलै पर्यंत चालणार ही प्रक्रिया**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई म्हणजेच एम.एस.बी.टी.ई. मार्फत चालवल्या जाणाऱ्या बारावी सायन्स नंतरच्या डी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता कॅप रजिस्ट्रेशन करण्याच्या तारखा जाहीर झाल्या असून, मंगळवार दि ३० जून २०२६ पासून ते बुधवार, दि. १५ जुलै २०२६ अखेर पर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन करता येणार आहे.' अशी माहिती श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.), पंढरपूरचे प्राचार्य डॉ. सतिश मांडवे व कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली.

बारावी सायन्स नंतर असलेल्या डी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता रजिस्ट्रेशन करण्याच्या तारखा जाहीर झाल्या असून मंगळवार दि ३० जून २०२६ पासून या प्रक्रियेस सुरवात झाली आहे. जर प्रवेश अर्जामध्ये कांही त्रुटी असतील तर दुरुस्ती दि. १८ जुलै ते २० जुलै २०२६ या दरम्यान करता येईल. या प्रक्रियेनंतर दि. २१ जुलै २०२६ रोजी अंतिम गुणवत्ता यादी डीटीईच्या संकेतस्थळावर पाहता येईल. रजिस्ट्रेशन करताना विद्यार्थ्यांकडे आपल्या प्रवर्गानुसार योग्य ती कागदपत्रे असणे आवश्यक आहे. संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी.रोंगे यांच्या




दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, प्राचार्य डॉ. सतीश मांडवे व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या सुविधा केंद्राचे काम काज सुरु आहे. याचा लाभ बारावी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांना डी.फार्मसीला प्रवेश घ्यायचा आहे असे विद्यार्थी व त्यांच्या पालकांना घेता येणार आहे. या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. पंढरपूर परिसर व पंचक्रोशीतील नागरिकांच्या मागणीनुसार सन २००६ साली कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.) महाविद्यालय स्थापन झाले होते. आदरयुक्त शिस्त व संस्कार यासाठी प्रसिद्ध असलेल्या या महाविद्यालयातील विद्यार्थी गुणवत्ता यादीत देखील सातत्याने आघाडीवर असल्याचे दिसून येते. त्यातून हे महाविद्यालय पहिल्याच फेरीत फुल्ल होत असल्यामुळे या महाविद्यालयातच आपल्याही पाल्याने शिक्षण घ्यावे या हेतूने पालकांच्या मागणीला जोर चढल्यामुळे यावर सारासार विचार करून चार वर्षापूर्वी (२०२१) आणखी एका डी. फार्मसी या कोर्सची सुरवात कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री) महाविद्यालयात करण्यात आली. वार्षिक परीक्षांचे निकाल, वसतिगृहाची सुविधा, रात्र अभ्यासिका आदी विद्यार्थी पूरक सुविधांमुळे पालक व विद्यार्थ्यांचा स्वेरीकडे ओढा वाढत आहे. डी. फार्मसीच्या प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रा.सौरभ कौलगी (मोबा.क्र.-९४२१५८८९२३) व डॉ.वृणाल मोरे (मोबाईल- ९६६५१९६६६६) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**आषाढी वारी २०२६ मध्ये वारकऱ्यांना सोयी सुविधा देण्याबरोबरच स्वच्छतेलाही सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार**

# आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भीमा नदी वाळवंटात स्वच्छता मोहीम; जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उचलला कचरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने यात्रा कालावधीत १२ ते १५ लाख भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येतात. यातील लाखो भाविक भीमा नदीच्या तीरावर स्नान व दर्शनासाठी येत असतात. मात्र, नदीपात्राच्या दोन्ही बाजूला वाळवंटात कचरा व कचरायुक्त वस्तू मोठ्या प्रमाणात पडलेल्या असतात.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने भीमा नदीच्या वाळवंटात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः वाळवंटातील कचरा उचलून या मोहिमेची सुरुवात केली. त्यांच्या समवेत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह महसूल, पोलीस, नगरपरिषद व अन्य विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने





सहभागी झाले होते.

भाविकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देण्याचा निर्धार

आषाढी वारीसाठी येणाऱ्या लाखो वारकरी-भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण मिळावे, या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली. चंद्रभागेच्या वाळवंटात प्लास्टिक पिशव्या, निर्माल्य, खाद्यपदार्थांचे अवशेष व इतर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी नागरिकांना व भाविकांना आवाहन केले की, पंढरपूर हे लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. नदीपात्र व वाळवंट स्वच्छ ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. प्रशासनाच्या वतीने ही नियमितपणे कचरा उचलण्यासाठी सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. परंतु नागरिक, भाविक यांनी कचरा वाळवंटात नदी तीरावर कुठेही न टाकता कचराकुंडीत टाकावा व प्रशासनाला सहकार्य करावे. यावर्षीच्या वारीतही स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले की, यात्रा कालावधीत स्वच्छतेबरोबरच सुरक्षिततेवरही विशेष भर दिला जाणार आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी वारी काळात नियमित स्वच्छता, पिण्याचे पाणी व इतर सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले.

या मोहिमेमुळे आषाढी वारीपूर्वीच भीमा नदीचे वाळवंट स्वच्छ झाले आहे. तसेच नगरपरिषदेच्या वतीने नियमितपणे स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.